एक राजा होता. त्याला एक ७ वर्षांची मुलगी होती. तिला सर्वजण राजकन्या म्हणून हाक मारीत असत. तिला दररोज झोपताना गोष्ट सांगावी लागे. गोष्ट संपली की ती खूप रडायला लागायची. "मला न संपणारी गोष्ट सांगा" म्हणून ती हट्ट करी. सगळ्याच गोष्टींना शेवट असायचा. शेवटी राजाने सर्वांना सांगितले की जो कोणी माझ्या राजकन्येला न संपणारी गोष्ट सांगेल त्याला मी मोठ्ठे बक्षिस देईन. एक माणुस आला. त्याने गोष्टीला सुरूवात केली. "एक होते गांव, तेथे खूप तांदळाची शेते होती. तांदूळाच्या धान्याने मोठाल्या कोठ्या भरल्या होत्या. एकदा काय झाले? एक चिमणी आली व एक तांदळाचा दाणा घेवून उडून गेली. दुसरी चिमणी आली. तांदळाचा दाणा घेवून उडून गेली. तिसरी चिमणी आली व तांदळाचा दाणा घेवून उडून गेली. चौथी चिमणी आली. तांदळाचा दाणा घेवून उडून गेली. --- सोळावी चिमणी आली. तांदळाचा दाणा घेवून उडून गेली. शंभरावी चिमणी आली. तांदळाचा दाणा घेवून उडून गेली.---- " अशातऱ्हेने तो न संपणारी गोष्ट सांगतच राहिला. राजकन्येला या न संपणाऱ्या गोष्टीचा कंटाळा आला. राजकन्या म्हणाली "मला गोष्ट नको."

प्रश्न.

१) राजकन्या का रडायची?

२) राजाने काय केले?

३) माणसाने कोणती गोष्ट सांगितली?

४) गोष्ट का संपत नव्हती?

५) राजकन्येला न संपणारी गोष्ट आवडली. चूक का बरोबर?

पुस्तका सारखा दुसरा मित्र किंवा मैत्रिण नाही. आपल्याला इतर खूप मित्र असतात. ते कधी रागावतात, भांडतात, अभ्यासात मदत करतात किंवा आपण आजारी असलो तर चौकशी पण करतात. कधी मजा करतात व एकत्र पण खेळतात. पुस्तक वाचण्यासाठी ते हातात घ्यावे लागते. आपण पुस्तकाला वाचायला सुरूवात केली की पुस्तक गोष्ट रंगवून सांगतात. शब्दांची आणि वाक्यांची जादू असते. एक पान वाचून संपले की दुसरे पान तय्यार. पुस्तक संपल्याशिवाय खाली ठेवावसे वाटत नाही. काही पुस्तके वाचताना जगाची माहिती होते. पुस्तकात लिहिलेली वर्णने जशीची तशी आपल्या डोळ्यासमोर उभी राहातात. पुस्तक कुठेही पळुन जात नाही पण तुम्ही ठरवाल तेंव्हा ते वाचण्यासाठी तयार असते.

प्रश्न. --

१) मित्र / मैत्रिण कशी असतात?

२) पुस्तकाला मित्र का म्हटले आहे?

३) पुस्तक वाचण्याने काय होते?

४) पुस्तक कोणती जादू करते?

५) तुमचे आवडते पुस्तक कोणते? कां?

# पाचगणी

जवळपास महाबळेश्वर इतकेच उंच असलेले आणखी एक थंड हवेचे ठिकाण म्हणजे पाचगणी. महाबळेश्वरपासून हे ठिकाण अवघ्या १८-२० कि. मी. अंतरावर आहे. पाच डोंगराच्या समूहावर हे ठिकाण विकसित झाले आहे म्हणून त्यास पाचगणी नाव पडले. महाबळेश्वर इतकेच सुंदर हे ठिकाण आहे. लोणावळा-खंडाळा ही ठिकाणं जशी एकमेकांपासून जवळ आहेत. तसाच प्रकार महाबळेश्वर-पाचगणी यांच्या बाबतीत आहे. हे ठिकाण येथील पब्लिक स्कूल्ससाठी खूप प्रसिद्ध आहे. जुन्या काळात येथे पारशी लोकांनी बांधलेले बंगले आजही लक्ष वेधून घेतात. येथे राहण्याजेवणाच्या चांगल्या सोयी आहेत. उत्कृष्ट हवामान आणि संपन्न निसर्ग हे पाचगणीचं स्वत:चं असं वैशिष्ट्य आहे. इथे खोल दऱ्या, धबधबे, कमलगड, टेबल लँड, किडीज पार्क, पाचगणीच्या गुंफा ही काही प्रसिद्ध व पाहण्यासारखी प्रेक्षणीय स्थळं आहेत.

**प्रश्न-**

1. पाचगणी हे काय आहे?
2. ह्या गावाला पाचगणी असे का म्हणतात?
3. लोणावळा-खंडाळा आणि महाबळेश्वर-पाचगणी यात काय साम्य आहे?
4. पाचगणी कोणत्या गोष्टीसाठी प्रसिद्ध आहे?
5. पाचगणीतील दोन प्रेक्षणीय स्थळे सांगा.

# गोष्ट

एक लहान गाव होते. गावातून नदी वाहत होती. नदीवर फळीचा छोटा पूल होता. तो पूल खूप अरुंद होता. त्या पुलावरून एका वेळी एकच जण जाऊ शकत असे. जर दोन्ही बाजूने एकाच वेळी कोणी आले तर त्यांची टक्कर होईल. मग ते पूल पार करून कसे जातील बरे?

एकदा अशीच गंमत झाली. एक बकरा पुलाच्या एका बाजूने निघाला. नेमका त्याच वेळी दुसरा बकरा दुसरीकडून निघाला. ते दोघे पुलावर मधोमध आले. त्यांना कळले की फळीवरून एकावेळी एकचजण जाऊ शकतो.

एक बकरा शांतपणे खाली बसला. दुसरा बकरा त्याच्या पाठीवरून उडी मारून पलीकडे गेला. नंतर पहिला बकरा उठला व तोही चालू लागला. अशा रीतीने, समंजसपणा दाखवून दोघांनीही तो पूल पार केला.

नंतर एके दिवशी अजून एक गंमत झाली. दोन तीरांवरून दोन लांडगे पुलावर आले. दोघांना कळले की फळीवरून एकावेळी एकचजण जाऊ शकतो.

आपल्याला पलीकडे जाता यावे, याकरिता ते एकमेकांशी भांडू लागले. शेवटी ते मारामारी करू लागले.

फळी फारच अरुंद होती. मारामारी करता करता, दोघेही पाय घसरून नदीत पडले व बुडून मेले.

**प्रश्न -**

1. नदीवरचा पूल कसा होता?
2. दोन बकरे पुलावर मधोमध सामोरासोमार आल्यावर काय झाले?
3. दोन लांडगे पुलावर मधोमध सामोरासोमार आल्यावर काय झाले?
4. गोष्टीला काय नाव द्याल?
5. तुम्ही ह्या गोष्टीतून काय शिकलात?

# <u>धनाची गोष्ट</u>

एक म्हातारा शेतकरी होता. त्याला पाच तरूण मुलं होती. पण ती आळशी होती. कष्ट करणे त्यांना अजिबात माहिती नव्हते. फक्त वडिलांच्या पैशांवर <u>मजा मारणे</u> एवढेच त्यांचे काम. त्यांचे वडील मात्र फार कष्ट करत. मुलांच्या आळशीपणामुळे त्यांच्या मनात विचार यायचा, की आपण गेल्यानंतर यांचे काय होणार. त्यांचा संसार कसा <u>उभा रहाणार</u> ?

शेवटी त्यांना एक कल्पना सुचली. एके दिवशी त्यांनी आपल्या पाचही मुलांना बोलावले व सांगितले की आपल्या शेतात सोन्यांच्या नाण्यांचा हंडा पुरलेला आहे. मी उद्या गावाला गेल्यावर तुम्ही शेत खणा व ते धन काढून पाचही जणांत वाटून घ्या.

दुसऱ्या दिवशी तो शेतकरी गावाला गेल्यानंतर या पाच जणांनी सोन्याच्या हंड्यासाठी सर्व शेत खणून काढले. पण त्यांना काही तो हंडा सापडला नाही. मग त्यांनी विचार केला की एवढे खणले आहे तर येथे धान्य पेरावे. म्हणून त्यांनी तेथे धान्य पेरले. त्या हंगामात चांगला पाऊस पडला. त्यामुळे त्यांना भरघोस उत्पन्न मिळाले. ते त्यांनी बाजारात विकले. त्यांना भरपूर धन मिळाले. <u>परगावाहून</u> जेव्हा त्यांचे वडील आले, तेव्हा या पाच मुलांनी ते गेल्यानंतर काय झाले ते सांगितले.

तेव्हा वडील म्हणाले, 'मी तुम्हाला ज्या धनाची गोष्ट सांगत होतो तेच हे धन. जर तुम्ही अशीच मेहनत दररोज केलीत, तर तुम्हाल दरवर्षी असे धन मिळेल.

---

प्रश्न-

1. शेतकऱ्याची पाच मुले कशी होती?
2. शेतकऱ्याला मुलांची काळजी का वाटायची?
3. शेतकऱ्याने कोणती कल्पना सुचली आणि त्याने काय केले?
4. मुलांनी शेत खणल्यावर काय झाले?
5. धन म्हणजे काय आणि ते कसे मिळते?

# <u>कबुतरे आणि पारधी</u>

एका गावाबाहेर एक मोठे वडाचे झाड होते. त्या झाडावर बरेच पक्षी राहात होते. त्या झाडावर एक कावळा ही रहात होता. एकदा खाणे शोधायला कावळा गावाकडे उडत जात होता. एवढ्यात त्याच्या एक पारधी जाळे घेऊन जाताना दिसला.

ते बघून कावळ्याला वाटले, "हा दुष्ट पारधी वडाच्या झाडाकडेच चालला असणार. म्हणजे आपल्या मित्रांवर संकट येणार तर....! कावळा तसाच वडाच्या झाडावर परत आला. आणि सर्व पक्षांना म्हणाला, "हा दुष्ट पारधी धान्य टाकून तुम्हाला जाळ्यात अडकवण्यास येत आहे. तुम्ही धान्य खाण्याच्या <u>मोहाने</u> जर गेलात तर त्या जाळ्यात अडकाल!" पारधी थोड्यावेळातच त्या झाडाजवळ आला आणि जाळं टाकून बाजूला बसला.

तेवढ्यात कबूतरांचा थवा अन्नाच्या शोधासाठी आकाशातून उडत जात होता. त्याच्या नजरेस पारध्याने टाकलेले धान्य दिसले. तो थवा त्या धान्यावर <u>तटून पडला</u> आणि त्या जाळ्यात अडकला. बरीच कबुतरे जाळ्यात अडकल्याचे बघून पारधी खूष झाला. त्या कबुतरांना पकडण्यासाठी पारधी धावत आला. त्या बरोबर सर्व कबुतरे जोर करून उडू लागली. कबुतरे जाळ्यासकट उडून गेली. उंदरांच्या मदतीने

त्यांनी स्वःताची जाळ्यातून सुटका करून घेतली आणि पारधी स्वत:च्या नशिबाला दोष बसला.

---

प्रश्न-

1. कावळ्याने गावात जाताना काय पाहिले?
2. त्यानंतर कावळ्याने काय केले?
3. पारध्याने पक्षांना पकडण्यासाठी काय केले?
4. कबुतरे जाळ्यात अडकल्यावर त्यांनी स्वतःला कसे सोडवले?
5. कबुतरांनी कोणाची मदत घेतली?